# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 147 / शि.वि. / 2015
दि. / 02 / 2015

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
म.न.पा.,नागपूर.

**विषय :– कॅन्सर रोग निदान चाचणी शिबिरास उपस्थित राहण्याबाबत.**

संदर्भ :– डॉ. वरूण भार्गव अध्यक्ष, PEACE Foundation Nagpur यांचे दि. 24.02.2015 चे पत्रान्वये.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, PEACE Foundation Nagpur य तर्फे **"तबांखू मुक्ती अभियान"** अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत रविवार दि. 15 मार्च 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता चिटणवीस कनव्हेंशन सेंटर, सिव्हिल लाईन, नागपूर येथे कॅन्सर प्रतिबंधक उपाययोजनाबाबत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून उद्भोधनाचा लाभ घ्यावा.

तसेच दि.16 मार्च ते 21 मार्च 2015 या कालावधीत CARE Hospital, पंचशील चौक, नागपूर येथे कॅन्सर रोग निदान चाचणी शिबिर आयोजित केले आहे.

दिनांक 17 मार्च व 20 मार्च 2015 ला दुपारी 3.00 वाजता CARE Hospital, पंचशील चौक, नागपूर येथे **"तबांखू मुक्ती अभियान"** अंतर्गत उद्‌बोधन वर्गाचे (Counseling) आयोजन करण्यात आले आहे. तरी उपरोक्त कार्यक्रमांचा लाभ आपण घेवून गरजू विद्यार्थी व पालकांना याबाबत सूचित करावे.

उपरोक्त कार्यक्रमाव्दारा तबांखू सारख्या अमंली पदार्थापासून पालक व विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याकरीता उपयुक्त माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमात सहभागी होणे अत्यावश्यक आहे.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc